# मराठी कथात्म साहित्य

संपादक
डॉ. मथु सावंत
डॉ. विठ्ठल जंबाले
डॉ. मल्लिकार्जुन तंगावार



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
यांच्या मराठी अभ्यासक्रमास अनुसरून व अभ्यास मंडळाच्या मान्यतेने
बी.ए. प्रथम वर्ष, सत्र-दुसरे करिता मराठी ऐच्छिक अभ्यासपत्रिका - तिसरी
( MAR - III ) या विषयासाठी नेमण्यात आलेले पाठ्यपुस्तक.

# मराठी कथात्म साहित्य


**: संपादक :**

**डॉ. मथु सावंत**

पीपल्स कॉलेज, नांदेड.

**डॉ. विठ्ठल जंबाले**

देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड.

**डॉ. मल्लिकार्जुन तंगावार**

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर.



चिन्मय

**चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक, यांत्रिकी, साधनांनी, फोटो कॉपी, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. करिता हक्क राखून ठेवले आहेत.

**मराठी कथात्म साहित्य**

: संपादक :

डॉ. मधु सावंत

डॉ. विठ्ठल जंबाले

डॉ. मल्लिकार्जुन तंगावार


| | |
|---|---|
| **प्रकाशक**<br>**चिन्मय प्रकाशन**<br>हॅटेल रिप्स,राजहंस कोचिंग क्लासेस शेजारी, पैठणगेट, औरंगाबाद.<br>मो. ९८२२८७ ५२१९, ८७८८१३१६१५९<br>Email : chinmayprakashan@gmail.com | ©कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड<br>**मुद्रक :** महारूद्र ऑफसेट औरंगाबाद.<br>**छायाचित्र :** श्री सुरेश जोंधळे<br>**मुखपृष्ठ :** अपूर्वा ग्राफिक्स औरंगाबाद. |
| **अक्षरगुंफण**<br>**ज्ञानेश्वर के. सुस्ते**<br>वेदिका टाईपसेटर्स, औरंगाबाद | **₹ : १००/-.** |

**ISBN : 978 - 93 - 84593 - 90 - 2**


"आपण विद्यार्थ्याहून श्रेष्ठ व निराळे आहोत किंवा आपले स्थान वरचे आहे ही जाणीव न ठेवता आपण त्यांचे एक स्नेही व सहकारी आहोत असे समजून एकरूप होण्याची, त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा शिक्षक मुलांना चांगले शिक्षण देऊ शकेल. मी स्वतःला पुढीलप्रमाणे प्रश्न विचारायला आरंभ केला. मी स्वतःवर जितके प्रेम करतो तितकेच विद्यार्थ्यांवर करू शकेन काय? मी स्वतःला जशी क्षमा करतो, तशी विद्यार्थ्यांना त्यांच्या चुकीबद्धल क्षमा करू शकेन काय? त्यांच्या सुखदुःखात मी सहभागी होऊ शकेन काय? मुलांच्या जीवनातील सर्व अवस्थांत मी त्यांच्याशी पूर्णपणे एकरूप होऊ शकेन काय? मी हे करू शकेन, असे मला वाटले आणि समर्पणाच्या भावनेतून मी शिक्षकाचे काम स्वीकारले."

**-स्वामी रामानंद तीर्थ**

## मराठी अभ्यास मंडळ
## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

- **प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख**
  अध्यक्ष तथा मराठी विभागप्रमुख, स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
- **डॉ. पृथ्वीराज तौर**
  मराठी विभाग, स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
- **डॉ. राजकुमार मस्के**
  मराठी विभागप्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर.
- **डॉ. मार्तंड कुलकर्णी**
  मराठी विभागप्रमुख, सरस्वती विद्यामंदिर कला महाविद्यालय, किनवट, जिल्हा नांदेड.
- **डॉ. मथु सुरेश सावंत**
  मराठी विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड.
- **डॉ. सा. द. सोनसळे**
  मराठी विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी.
- **डॉ. पंढरीनाथ धोंडगे**
  मराठी विभाग, ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी.
- **डॉ. बी.बी. खंदारे**
  मराठी विभागप्रमुख, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली.
- **डॉ. जयद्रथ जाधव**
  मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जिल्हा लातूर.
- **डॉ. विठ्ठल जंबाले**
  मराठी विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड
- **प्रा.डॉ. शैलेंद्र लेंडे**
  मराठी विभागप्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
- **डॉ. वंदना महाजन**
  संचालक, का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे
- **डॉ. सुनीता सांगोले**
  मराठी विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर
- **अरविंद जगताप**
  १ बी ४०२, न्यू दिंडोशी, म्हाडा कॉम्प्लेक्स, मालाड (पू.) मुंबई - ९७
- **फ. मुं. शिंदे**
  ८३, 'यमुना', महात्मा गांधीनगर, पदमपुरा, औरंगाबाद -५



## शुभेच्छा !

बदलता विद्यार्थिवर्ग आणि बदलते शिक्षण यांचा एकसंध विचार करत मूल्यात्मक ज्ञानाची गरज ओळखून भाषा, साहित्याचा तसेच संस्कृतीचा विचार अभ्यासक्रमांच्या मध्यवर्ती असायला हवा. कारण, काळाची दृष्टी बदललेली आहे. तसेच विद्यार्थ्यांची अभिरुचीही बदललेली आहे. या अनुषंगाने एकूण अभ्याससाधनांची रचना बदलायला हवी. 'विविधता' ही आपल्या अभ्यासक्रमांची ओळख असायला हवी. यादृष्टीने, मराठी भाषा आणि साहित्याच्या या नव्या अभ्यासक्रमांची मांडणी केलेली आहे. जी मांडणी एकंदर विद्यार्थिकेंद्री असून, या विद्यापीठाच्या अशा पाठ्यपुस्तकांमधून तसेच याप्रकारच्या संपादनांमधून सरळपणे जाणवते! म्हणूनच, या पाठ्यपुस्तकांचे अध्ययन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसह सर्व शिक्षकांना यानिमित्त माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. उद्धव भोसले**
कुलगुरू,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

## संपादकीय ....

२०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडमधील कला पदवी प्रथम वर्षाच्या ऐच्छिक मराठी विषयाच्या दुसऱ्या सत्रातील अभ्यासपत्रिका - तिसरी करिता **'मराठी कथात्म साहित्य'** हे संपादित पुस्तक विद्यार्थी आणि वाचकांच्या हाती देत असताना आम्हांला खचितच आनंद होत आहे. प्रस्तुत पुस्तक व आतील अभ्यासघटक विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणारे, वाचन आणि लेखनाबद्दलची अभिरूची वृद्धिंगत करणारे आणि मानवी मूल्यांची रुजवणूक करणारे आहेत. साहित्याविषयी गोडी, जिज्ञासा व कुतूहल या अभ्यासपत्रिकेद्वारे निर्माण होईल, याबाबत शंकाच नाही. सद्य:स्थितीत निर्माण झालेल्या नैराश्यवादी वातावरणामध्ये आशावादी व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचे सामर्थ्य या अभ्यासपत्रिकेतील घटकांमध्ये निश्चितच आहे. या प्रयोजनामधूनच प्रस्तुत पुस्तकाचे संपादन करण्यात येत आहे. तीन गटांत विभागलेल्या या पुस्तकात एकूण दहा प्रकरणे आहेत. विद्यार्थ्यांना कथात्म मराठी साहित्याची ओळख व्हावी, हा यामागील मुख्य हेतू आहे.

मानवी जीवनात कथात्म साहित्याला प्रदीर्घ अशी परंपरा आहे. प्राचीन साहित्य, लोकसाहित्य, मध्ययुगीन मराठी साहित्य आणि आधुनिक मराठी साहित्यामध्ये कथात्म साहित्याची परंपरा आढळते. लोकसाहित्यामध्ये परंपराप्रिय लोकांनी मौखिकतेने आणि मराठी साहित्यामध्ये लेखक कवींनी लेखनाद्वारे कथात्म साहित्य परंपरा जपलेली आहे. कथात्म साहित्य हा प्रकार लिखित असो वा अलिखित तो सार्वकालिक आहे. कादंबरी, कथा, नाटक व चित्रपट इत्यादींमध्ये एखादी कथा दडलेली असते. त्याचप्रमाणे परंपरेने प्रचलित सुंबरान, गोंधळ इत्यादी कलाप्रकारांमध्ये कथेची बीजे दडलेली असतात. अशा कथनरूपात लोककथा, लीळा, नीतिकथा, दृष्टान्त, लघुकथा, बखर, आठवणी इत्यादी लेखन प्रकारांचा समावेश होतो.

कथात्म साहित्यामध्ये अनुभव आणि संवाद यास अनन्यसाधारण

असे महत्त्व आहे. कथन म्हणजे निवेदन. निवेदन म्हणजे सांगणे. गद्यात कथात्मकता आलेली असते व काही पद्यांचा अविभाज्य भागही बनलेली असते. संतांच्या अभंग व इतर लेखनातील दृष्टान्तांमधून याचा प्रत्यय येतो. कथात्म साहित्य वाचनीय व श्रवणीय असते. त्यामध्ये 'कथा' हा शब्द कथन या अर्थाने येतो. परंतु कथात्म साहित्याचा संबंध अधिकाधिक गद्याशी येतो.

प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या भागात चरित्रात्मक वेचे समाविष्ट आलेले आहेत. भारतीय समाजातील वंदनीय-आदर्श व्यक्ती व त्यांचे कार्य वर्तमानकाळाबरोबरच भविष्यकाळासाठी पथदर्शक आहे. त्यामुळे 'थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पहा जरा' ही उक्ती अधिक समर्पक ठरते. समाजात नावारूपाला आलेल्या माणसांना परिस्थितीशी खूप झगडावे लागले. त्यांनी कार्य करीत असताना त्यांच्या सभोवतीचे वातावरण प्रतिकूल होतेच. परंतु वाळवंटामध्ये हिरवळ निर्माण करण्याची दृष्टी आणि कृती यांचा स्थूल परिचय घडावा, या हेतूने या पुस्तकामध्ये चरित्रात्मक वेचे समाविष्ट केले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुद्ध अँड हिज धम्म' या ग्रंथातील 'अंगुलीमालाची धम्मदीक्षा' या चरित्रात्मक उताऱ्यामधून सज्जनांची सक्रियता समाजास कशी हितकारक ठरते, याचा प्रत्यय येतो. आजही समाजाला महात्मा गौतम बुद्धांच्या अहिंसात्मक विचारांची नितांत गरज आहे. महात्मा गौतम बुद्धांच्या मार्गदर्शनामुळे आणि सहवासामुळे डाकू अंगुलीमाल सत्पुरुष बनतो. म्हणून बुद्धविचार आचरणात आणल्याने आणि योग्य संदेश, वातावरण आणि विचारांची शिदोरी मिळाल्यास माणसांमध्ये सर्वांगीण बदल घडू शकतो. हे प्रस्तुत पाठातून निदर्शनास येते. तसेच प्रस्तुत पाठातील संवादात्मक शैलीमुळे वाचक अंतर्मुख बनतात. छत्रपती शिवाजी महाराज यशस्वी आणि लोकप्रिय राजे का ठरले, याचा मागोवा कृष्णराव केळुसकर यांच्या 'छ. शिवाजी महाराजांचे गुणसंकीर्तन' या चरित्रात्मक उताऱ्यामधून अभ्यासता येतो. सतराव्या शतकात रयतेचे हित हेच जीवनाचे अंतिम ध्येय ठरवून या अलौकिक पराक्रमी राजाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक



इतिहासात अद्वितीय अशी कामगिरी केली. वर्तमान समाजामध्ये सामाजिक, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात नेतृत्व करणाऱ्यांसाठी हे चरित्र प्रेरणादायी आहे. प्रस्तुत पुस्तकातील चरित्रात्मक गटामध्ये संजय सोनवणी लिखित महाराजा यशवंतराव होळकर' या ग्रंथातील 'अद्वितीय स्वातंत्र्ययोद्धा' हा चरित्रात्मक वेचा घेतलेला आहे. या पाठामधून इंदोर येथील पराक्रमी क्रांतिकारी राजा यशवंतराव होळकर यांच्या ब्रिटिशविरोधी स्वातंत्र्यलढ्याचे चित्तथरारक प्रसंग अनुभवास येतील. होळकरांनी आपल्या युद्धनीतीमधून दोन तृतीयांश पृथ्वीवर अधिराज्य गाजविणाऱ्या ब्रिटिशांना 'सळो की पळो' करून सोडले. भारतामधील इतर प्रदेशातील राजेरजवाडे यांची मोट बांधून इंग्रजांविरोधी रणांगण कसे गाजविले, याबाबतचे वर्णन प्रस्तुत पाठात आलेले आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या दुसऱ्या भागात स्वकथनातील तीन उताऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. मराठी साहित्यामध्ये आत्मकथनांची समृद्ध परंपरा आहे. मध्ययुगीन कालखंडामध्ये संतांनी आपल्या अभंगादी रचनेमधून आत्मचरित्रपर भाष्य केले. आत्मकथनपर लेखनामधून जीवनामधील बरेवाईट अनुभव, शब्दबद्ध केलेले असतात. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' या उक्तीप्रमाणे भूत वर्तमानाचे अंतर्नाट्य आत्मकथनात दडलेले असते. 'स्व' चा शोध घेताना समकालीन जीवनवास्तवाचे यथार्थ चित्रण केलेले असते. महाराष्ट्रातील समाजसुधारकांमध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांची चिकित्सक दृष्टी कशी होती याचा प्रत्यय 'पावनगड' या उताऱ्यामधील वर्णनामधून येतो. तसेच लक्ष्मण माने यांचे 'उपरा' हे आत्मकथन भारतीय साहित्यामध्ये परिचित आहे. या कृतीतील लेखकाच्या जीवनातील खडतर प्रसंगचित्रण 'मी शाळेत जातो.' या उताऱ्यामधून आलेले आहे. तसेच 'झपाटलेपण ते जाणतेपण' या प्रतीक्षा लोणकर यांच्या आत्मकथनपर पुस्तकामधून 'झपाटलेपण' हा वेचा घेतलेला आहे. या लेखात नाट्यक्षेत्रातील अनुभव कथन हे सहृदय कलावंताना चिरंतन प्रेरणा देणारे ठरतात.

प्रस्तुत पुस्तकातील तिसऱ्या विभागामध्ये कथात्म लेखन प्रकारांपैकी कथा, प्रवासवर्णन, ललितगद्य व कादंबरी अंश या साहित्य प्रकारांचा

समावेश करण्यात आलेला आहे. मराठी साहित्यात कथा हा साहित्यप्रकार गुजगोष्टी, लघुकथा व नवकथा या क्रमाने आधुनिक काळात विकसित झालेला आहे. कथेमध्ये कथानक, पात्रे, वातावरण, संवाद व भाषा या घटकांचे महत्त्व असते. या पुस्तकामधील 'शेवंतीचा खराटा' ही श्री.म.माटे यांची कथा वाचकाला विचारप्रवण बनविते. या कथेची नायिका 'शेवंता' ही प्रतिकूल परिस्थितीतही कार्यात प्रामाणिकपणे मग्न राहते, याकडे वाचकांचे लक्ष वेधते.

प्रस्तुत पुस्तकामधील 'दोन ज्ञानचक्षू' हा पु.ल.देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' या प्रवासवर्णनपर ग्रंथातील वेचा. प्रवासवर्णनात स्थळ, व्यक्ती, निसर्ग संस्कृती आणि प्रवास या घटकांना महत्त्व असते. ब्रिटनमध्ये केंब्रिज आणि ऑक्सफर्ड या दोन विद्यापीठांनी जागतिक स्तरावर शैक्षणिक जडणघडण केलेली असून महान तत्त्ववेत्त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसन येथेच घडले. यात परदेशातील शिक्षण व्यवस्थेबद्दलचे अनुभवकथन केलेले आहेत, याची प्रचिती प्रस्तुत वेच्यात घडते. 'ललितगद्य' हा साहित्यप्रकार फारसा लोकप्रिय नाही. पण लालित्य हे या वाङ्मयप्रकाराचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. 'श्रावण' या ललितलेखातून द.ता.भोसले यांनी श्रावण महिन्यातील सण-उत्सव आणि निसर्गातील उत्सवी वातावरण याचे केलेले लालित्यपूर्ण वर्णन वाचकांना मोहिनी घालणारे आहेच. तसेच मराठवाड्यातील प्रादेशिक समस्या आणि दुष्काळ यावर आधारित सुशील धसकटे यांनी 'जोहार' ही कादंबरी लिहिली. मराठवाड्याच्या नशिबी नेहमी दुष्काळ येतो. दुष्काळामध्ये स्त्रियांना किती संघर्ष करावा लागतो, दैनंदिन जगण्यामध्ये संकटांची मालिका अखंडित असते, याचे प्रतिबिंब 'मराठवाड्यातील दुष्काळ' या कादंबरी अंशामध्ये उमटलेले आहे.

'मराठी कथात्म साहित्य' या पुस्तकामध्ये वाङ्मयप्रकारांचे वैविध्य जपण्याचा प्रयत्न केलेला असून आमच्या (संपादक मंडळाच्या) या भूमिकेचे विद्यार्थी, प्राध्यापक आणि वाचक अभ्यासक स्वागत करतील, अशी आशा वाटते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत मराठी अभ्यास मंडळाने प्रस्तुत अभ्यासघटक निश्चित करून या कार्यास



गती प्राप्त करून दिली. यामध्ये मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख आणि सन्माननीय सदस्यांनी पुस्तकाला मूर्त रूप देण्याचे स्वातंत्र्य दिले. मराठी विषयाचा हेतू अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तक निर्दोष व्हावे, याकरिता सतत मार्गदर्शन करणारे मा. कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, मा. प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन आणि मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता मा. डॉ. भगवान जाधव या सर्वांप्रति कृतज्ञता प्रकट करण्यात येते. तसेच चिन्मय प्रकाशन, औरंगाबादचे श्री. विश्वंभर कुलकर्णी यांचे ऋण शब्दातीत आहे.

**संपादक**

**डॉ. मथु सावंत**

**डॉ. विठ्ठल जंबाले**

**डॉ. मल्लिकार्जुन तंगावार**

# ।। अनुक्रम ।।

**चरित्र :**


१. **अंगुलीमालाची धम्मदीक्षा** ११
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

२. **छत्रपती शिवाजी महाराजांचे गुणसंकीर्तन** २५
- कृष्णराव केळुसकर

३. **अद्वितीय स्वातंत्र्ययोद्धा** ४१
- संजय सोनवणी


**आत्मकथन :**


४. **पावनगड** ५७
- महर्षी वि.रा.शिंदे

५. **मी शाळेत जातो** ६४
- लक्ष्मण माने

६. **झपाटलेपण** ७०
- प्रतीक्षा लोणकर


**कथा, प्रवासवर्णन, ललितगद्य व कादंबरी अंश**


७. **शेवंतीचा खराटा** ८४
- श्री. म. माटे

८. **दोन ज्ञानचक्षू** ९२
- पु.ल.देशपांडे

९. **श्रावण** १०६
- द. ता. भोसले

१०. **मराठवाड्यातील दुष्काळ** ११४
- सुशील धसकटे